# संघटनकुशल तात्याराव इनामदार

**सहकार भरतीचे सलग दहा वर्षे संघटनप्रमुख राहिलेले आणि संघाचे प्रचारक म्हणून ज्यांनी संपूर्ण आयुष्य वेचले, अशा तात्याराव इनामदार यांना शुक्रवारी (ता. २१) पुणे येथे 'कै. अण्णासाहेब गोडबोले स्मृती पुरस्कार' मरणोत्तर प्रदान केला जात आहे. त्या निमित्ताने...**

सहकार भारतीचे संस्थापक अध्यक्ष असलेले आणि महाराष्ट्रातील अनेकविध सहकारी बँकांच्या स्थापनेमध्ये सक्रिय सहभागी राहिलेले सांगलीचे माधवराव तथा अण्णासाहेब गोडबोले यांची गेल्या वर्षी जन्मशताब्दी होती. गेल्या वर्षीच सहकाराचीदेखील शताब्दी आपण साजरी केली. अण्णसाहेब गोडबोले यांच्या जन्मशताब्दीमुळे त्यांच्या जीवनावर आधारित 'आधारवड' या चरित्रग्रंथाचे प्रकाशन सहकार भारतीने केले. अण्णांच्या जीवनाबरोबरच या ग्रंथामध्ये सहकार चळवळीची शताब्दी आणि सहकारमहर्षी वैकुंठभाई मेहता, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील, वसंतदादा पाटील, गुलाबराव पाटील आणि विमामहर्षी अण्णासाहेब चिरमुले यांच्या जीवनावरही प्रकाशझोत टाकलेला आहे. सहकार क्षेत्रात निरलसपणे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्याला पुरस्कार देण्यात यावा, जेणेकरून सहकार चळवळीमध्ये कै. अण्णासाहेबांच्या स्मृती चिरंतन राहाव्यात यासाठी या ग्रंथाच्या प्रकाशन समारंभामध्ये गोडबोले कुटुंबीयांनी काही निधी सहकार भारतीला अर्पण केला. त्यानुसार पहिला 'कै. माधवराव गोडबोले स्मृती पुरस्कार' सहकार भारतीचे सलग दहा वर्षे संघटनप्रमुख राहिलेले आणि संघाचे प्रचारक म्हणून ज्यांनी संपूर्ण आयुष्य वेचले, अशा कै. अच्युत माधव तथा तात्याराव इनामदार यांना समर्पित करण्यात येत आहे.

तात्याराव मूळचे सातारा जिल्ह्यातील खटावचे. त्या वेळच्या खटाव संस्थानमधले हे इनामदार. माधवराव इनामदारांना एकूण आठ मुलं आणि दोन मुली. या आठ भावांमध्ये तात्या सातवे. इनामदार कुटुंब म्हणजे संघमय कुटुंब. तात्यांचे मोठे भाऊ कै. लक्ष्मणराव हे वकील झाले; परंतु संघाने सांगितले म्हणून त्यांनी प्रचारक राहून अखंड देशसेवा केली. लक्ष्मणराव हे सहकार भारतीच्या संस्थापक सदस्यांपैकी एक. १९७८ मध्ये स्थापन झालेल्या सहकार भारतीमध्ये सुरवातीला अण्णासाहेब गोडबोले यांच्याबरोबर दत्तोपंत ठेंगडीदेखील होते. तात्यारावांचे दुसरे बंधू किसनराव हेदेखील सुरवातीला शिक्षक होते आणि नंतर संघप्रचारक म्हणून बाहेर पडले होते, तर अन्य इनामदार बंधूदेखील या ना त्या कारणाने संघकार्याशी जोडलेले होते. संघासाठी आणि संघ सांगेल त्यासाठी जगलेले हे इनामदार कुटुंब.

तात्यारावांच्या जीवनाकडे पाहिल्यास, 'मै नहीं तु ही' या श्री. गोळवलकर गुरुजींच्या वाक्याची आठवण होते, 'काय देवा?' असे म्हणून कार्यकर्त्यालाच देव मानणाऱ्या तात्यांनी आयुष्यभर अनेक कार्यकर्ते जोडले. अगदी छोट्यातला छोटा कार्यकर्ता असो, तात्यांची ओळख घट्ट झालीच म्हणून समजा. हे संबंध टिकवून ठेवण्यासाठी कधी प्रत्यक्ष भेटत, तर कधी पत्राने, दूरध्वनीवरसुद्धा. 'माझे काहीच काम नव्हते, फक्त ख्यालीखुशालीसाठी फोन केला,' असे म्हणणारे तात्या म्हणजे मायेचा परीसस्पर्श होते. इमानदार कुटुंबातदेखील तात्या नेहमी केंद्रस्थानी असत.

महाराष्ट्रात सहकार भारतीचे काम वाढविण्याचे श्रेय तात्यांना निश्चितच द्यावे लागेल. १९६६ पासून तात्या संघाचे प्रचारक. नगर आणि नाशिक जिल्ह्यांत प्रचारक म्हणून आणि विभाग प्रचारक, प्रांत सहव्यवस्थाप्रमुख अशा विविध जबाबदाऱ्या तात्यांनी अतिशय समर्थपणे पेलल्या. विश्व हिंदू परिषदेच्या आळंदी महाअधिवेशनाचे व्यवस्थाप्रमुख म्हणून तात्यांकडे जबाबदारी होती. संख्यात्मक आणि व्यवस्थात्मक सुंदर कार्यक्रमाचे हे एक बोलके उदाहरण. 'समाजाच्या समृद्धीसाठी सहकार' ही तात्यांची धारणा होती. त्यानुसार सहकारी संस्थांनी, सहकारी कार्यकर्त्यांनी काम केले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. काटकसर आणि हिशेबाबद्दल आग्रह, हादेखील त्यांचा जीवनविशेष होता. स्वतः चार्टर्ड अकौंटंट राहिलेल्या तात्यांना आर्थिक क्षेत्राची चांगली जाण होती. देशसेवेसाठी संपूर्ण आयुष्य समर्पित करणारे तात्या म्हणजे आदर्श कार्यकर्त्याचा वस्तुपाठ होते.

कै. माधवराव गोडबोले यांचे जीवनवैशिष्ट्य पाहिले, तर त्याच आदर्श परंपरेतील तात्या हे एक होते. अण्णासाहेबांनीदेखील स्वतःपेक्षा संस्था मोठी आणि संस्थेचे मोठेपण हेच स्वतःचे मोठेपण मानले. योग्य वेळेलाच आपले सर्व अधिकार सोडून नवीन कार्यकर्त्यांवर संस्थेची जबाबदारी सोपवून ते मोकळे झाले. असा आदर्श असणाऱ्यांच्या वाटेतील तात्या एक वारकरी होते. 'बिना संस्कार नही सहकार' हे सहकार भारतीचे ब्रीद अधोरेखित करणारी ही दोन व्यक्तिमत्त्वे. कै. अण्णासाहेब आणि कै. तात्यांच्या जीवनाचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून त्यांचे गुण आपल्यात संक्रमित करणे आणि सहकार चळवळीच्या व सहकार भारतीच्या निकोप वाढीसाठी सतत प्रयत्नशील राहणे, हीच आजच्या काळाची गरज आहे.

**भालचंद्र कुलकर्णी**